myresearchgo

**myresearchgo Volume 2, Issue 4,April 2026, ISSN: 3107-3816 (Online)**

# प्राचीन भारतीय विद्यापीठे आणि त्यांची ग्रंथालय परंपरा : एक ऐतिहासिक अभ्यास

सोनिया थविल

ग्रंथालय विभाग

छत्रपती शिक्षण मंडळाचे कला व वाणिज्य महाविद्यालय पडघा.

Email: soniyathavil1995@gmail.com

**सारांश**

प्राचीन भारतीय शिक्षणव्यवस्था ही अत्यंत विकसित, संघटीत आणि ज्ञानकेंद्रित होती. तक्षशीला, नालंदा, विक्रमशीला, वल्लभी आणि ओदंतपुरी यांसारख्या विद्या विद्यापीठांनी केवळ शिक्षणच नव्हे तर ज्ञानसंचय आणि संशोधनाला देखील चालना दिली. या संशोधन लेखात प्राचीन भारतीय विद्यापिठांची रचना, शिक्षणपद्धती आणि विशेषतः ग्रंथालय परंपरेचा अभ्यास करण्यात आला आहे. प्राचीन विद्यापीठांमध्ये ग्रंथालये ही ज्ञानसंपदेची मुख्य केंद्रे होती. विशेषतः नालंदा विद्यापीठाचे ‘‘धर्मगंज’’ ग्रंथालय जगप्रसिद्ध होते, ज्यामध्ये हजारो हस्तलिखित ग्रंथांचे जतन केले जात होते. हे ग्रंथालय विविध विभागांमध्ये विभागलेले होते आणि त्यात धर्म, तत्त्वज्ञान, वैद्यक, गणित, खगोलशास्त्र यांसारख्या विविध विषयांवरील ग्रंथ उपलब्ध होते. ग्रंथांचे जतन, वर्गीकरण आणि व्यवस्थापन अत्यंत पद्धतशीर रीतीने केले जात असे. या विद्यापीठांमध्ये शिक्षणपद्धती गुरुकुल प्रणालीवर आधारित होती, ज्यामध्ये शिक्षक-विद्यार्थी यांच्यात घनिष्ठ नाते निर्माण होत असे. विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील साहित्याचा अभ्यास करण्यास आणि संशोधन करण्यास प्रोत्साहन दिले जात असे. त्यामुळे ज्ञाननिर्मिती आणि ज्ञानवितरण या दोन्ही प्रक्रियांना चालना मिळत होती.

प्राचीन भारतीय ग्रंथालय परंपरेचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे तिचा आंतरराष्ट्रीय प्रभाव. चीन, तिबेट, कोरिया आणि इतर देशांतील विद्यार्थी येथे येऊन शिक्षण घेत असत आणि आपल्या देशात ज्ञानाचा प्रसार करत असत. त्यामुळे भारतीय ज्ञानपरंपरेचा जागतिक स्तरावर विस्तार झाला. तथापि, परकीय आक्रमणे, ग्रंथालयांचा नाश, राजाश्रयाचा अभाव आणि सामाजिक-राजकीय बदल यांमुळे या महान परंपरेचा ऱ्हास झाला. विशेषतः नालंदा विद्यापीठाच्या ग्रंथालयाचा नाश ही भारतीय इतिहासातील मोठी हानी मानली जाते.

एकूणच, प्राचीन भारतीय विद्यापीठे आणि त्यांची ग्रंथालय परंपरा ही ज्ञान, संशोधन आणि संस्कृतीचे भक्कम आधारस्तंभ होती. आजच्या आधुनिक ग्रंथालय व्यवस्थेसाठी ही परंपरा प्रेरणादायी असून, तिचा अभ्यास करून ज्ञानसंपदेचे जतन आणि व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे करता येऊ शकते.

**कीवर्ड्स:** प्राचीन भारतीय विद्यापीठे, प्राचीन ग्रंथालय व्यवस्था, भारतीय शिक्षण पद्धती (प्राचीन), ग्रंथालय परंपरा, नालंदा विद्यापीठ, तक्षशिला विद्यापीठ, विक्रमशिला विद्यापीठ, हस्तलिखित ग्रंथ संग्रह, ज्ञान जतन व संवर्धन, ज्ञान प्रसार व्यवस्था, भारतीय ज्ञान प्रणाली (IKS), बौद्ध शिक्षण परंपरा

## प्रस्तावना

भारतात प्राचीन काळापासून ज्ञान, शिक्षण आणि विद्या यांना अत्यंत महत्त्व दिले गेले आहे. ‘‘सा विद्या या विमुक्तये’’ या उक्तीप्रमाणे ज्ञान हे मनुष्याच्या विकासाचे मुख्य साधन मानले गेले. त्यामुळे भारतात प्राचीन काळात अनेक प्रसिद्ध विद्यापीठे आणि शिक्षण केंद्रे निर्माण झाली. या विद्यापीठांमध्ये केवळ शिक्षणच नव्हे तर ज्ञानसंपदेचे जतन, संशोधन आणि प्रसार यालाही मोठे महत्त्व होते. प्राचीन भारतीय विद्यापीठांच्या विकासात ग्रंथालयाची महत्त्वपूर्ण भूमिका होती. ग्रंथालये ही ज्ञानाची भांडारे मानली जात आणि त्यामध्ये विविध विषयांवरील हस्तलिखित ग्रंथ, धार्मिक ग्रंथ, तत्त्वज्ञान, वैद्यकशास्त्र, गणित, खगोलशास्त्र, व्याकरण आणि साहित्य यांचा मोठा संग्रह असायचा. प्राचीन काळातील नालंद, तक्षशीला, विक्रमशीला, वल्लभी यांसारख्या विद्यापीठांमध्ये मोठया प्रमाणात ग्रंथालय व्यवस्था अस्तित्वात होती.

या संशोधन लेखात प्राचीन भारतीय विद्यापीठांची वैशिष्ट्ये, त्यांची शिक्षणपद्धती आणि विशेषत: त्यांच्या ग्रंथालय परंपरेचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

## उद्दिष्टे

१. प्राचीन भारतीय विद्यापीठांची उत्पत्ती, विकास आणि ऐतिहासिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

२. तक्षशिला, नालंदा, विक्रमशीला, वल्लभी यांसारख्या प्रमुख विद्यापीठांची रचना व कार्यपद्धती समजून घेणे.

३. त्या काळाततील शिक्षणपद्धती (गुरुकुल प्रणाली, वादविवाद, अध्यापन पद्धती) यांचा अभ्यास करणे.

४. प्राचीन विद्यापीठांतील अभ्यासक्रम व शिकवले जाणारे विषय यांचे विश्लेषण करणे.

५. ग्रंथालय परंपरा, हस्तलिखित ग्रंथांचे जतन आणि ज्ञानसंचय यांचे महत्व अभ्यासणे.

६. या विद्यापीठांच्या आंतरराष्ट्रीय प्रभावाचा (विदेशी विद्यार्थ्यांची उपस्थिती) अभ्यास करणे.

७. प्राचीन विद्यापीठांच्या पतनाची कारणे शोधणे.

**संशोधन पद्धती**

या संशोधनात ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला असून, प्राचीन भारतीय विद्यापीठांच्या ग्रंथालय परंपरेचा अभ्यास विविध प्राथमिक व दुय्यम स्रोतांच्या आधारे करण्यात आला आहे.

**प्राचीन भारतीय शिक्षणपद्धतीची पार्श्वभूमी**

भारतातील शिक्षणपद्धती प्रामुख्याने गुरुकुल प्रणालीवर आधारित होती. विद्यार्थी गुरूंच्या आश्रमात राहून शिक्षण घेत असत. ही शिक्षणपद्धती केवळ शैक्षणिक ज्ञानापुरती मर्यादित नव्हती, तर नैतिक, आध्यात्मिक आणि सामाजिक मुल्यांवर आधारित होती. वैदिक काळात वेद, उपनिषेद, व्याकरण, तर्कशास्त्र, आयुर्वेद, गणित आणि खगोलशास्त्र यांचा अभ्यास केला जात असे. नंतरच्या काळात बौद्ध आणि जैन धर्माच्या प्रभावामुळे मोठया प्रमाणात विद्यापीठे स्थापन झाली. या विद्यापिठांमध्ये भारतासह परदेशातूनही विद्यार्थी शिक्षणासाठी येत असत.

**प्राचीन भारतीय शिक्षणसंस्थांची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे होती**

- निवासी शिक्षणपद्धती
- वादविवाद आणि चर्चेवर आधारित शिक्षण
- विविध विषयांचा अभ्यास
- ग्रंथसंपदेचे जतन

**प्राचीन भारतीय विद्यापीठांची परंपरा**

प्राचीन भारतात अनेक सुप्रसिद्ध विद्यापीठे होती. या विद्यापीठांनी भारताला ज्ञानकेंद्र म्हणून जगभरात प्रतिष्ठा मिळून दिली.

**प्राचीन भारतीय विद्यापीठे**

१. तक्षशीला विद्यापीठ

२. नालंदा वियापीठ

३. विक्रमशीला विद्यापीठ

४. वल्लभी विद्यापीठ

**१. तक्षशीला विद्यापीठ**

तक्षशीला हे जगातील सर्वात प्राचीन शिक्षणकेंद्र मानले जाते. तक्षशीला ही गंधर्व प्रांताची राजधानी होती. हे विद्यापीठ सध्याच्या पाकिस्थानातील रावळपिंडी शहरापासून २० मैलावर आहे. या विद्यापीठात वैद्यकीय साहित्य, तत्वज्ञान आणि अठरा शिल्पे यांवर अध्ययन-अध्यापन चालत असे. इ. स. पूर्व आठव्या शतकापासून इ. स. चौथ्या शतकापर्यंत सु. १,२०० वर्ष हे विद्यापीठ अस्थीत्वात होते. या विद्यापीठात मिथीला, उज्जैन, राजगृह आणि बनारस येथून विद्यार्थी येत असत. हे शिक्षण आणि बौद्धिक चौकशीचे प्रमुख केंद्र होते. येथे साधारणपणे १६-१७ वर्षे वयाचे विद्यार्थी घेतले जात असत. शिक्षणाचा कालावधी साधारणपणे ७-८ वर्षांचा असे. प्रसिद्ध विद्वान पाणिनी, चाणक्य आणि चरक यांचा तक्षशिलाशी संबंध होती. तक्षशिलामध्येही ग्रंथांचे संकलन आणि जतन करण्याची परंपरा होती. विद्यार्थ्यांना विविधा ग्रंथाच्या अभ्यासासाठी स्वतंत्र जागा दिली जात असे.

myresearchgo Volume 2, Issue 4,April 2026, ISSN: 3107-3816 (Online)

**तक्षशिलामध्ये पुढील विषय शिकवले जात-**

- वेद आणि वैदिक विधी
- आयुर्वेद
- खगोलशस्त्र आणि गणित
- तत्वज्ञान (हिंदू, बौद्ध, जैन.)
- धनुर्विद्या
- राजनीती आणि प्रशासन
- अर्थशास्त्र आणि वाणिज्य
- व्याकरण आणि भाषाशास्त्र
- कला आणि हस्तकला इ.

**तक्षशिला विद्यापीठातील ग्रंथालय**

तक्षशिला विद्यापीठात विस्तृत ग्रंथालय आणि ज्ञान-भांडार होते. त्यामध्ये हिंदुतत्व, राज्यशास्त्र, साहित्य, वैदिक व तत्वज्ञान या विषयासंबंधीचे वाचणसाहित्य संग्रहित करण्यात आले होते.

- हस्तलिखिते आणि ग्रंथ
- दुर्मिळ पुस्तके आणि गुंडाळया इ.

**२. नालंदा वियापीठ**

नालंदा हे प्राचीन भारतातील सर्वात प्रसिद्ध विद्यापीठ होते. याची स्थापना गुप्तकालीन सम्राट कुमारगुप्त यांनी पाचव्या शतकात केली होती. हे विद्यापीठ जवळपास ८०० वर्षे ज्ञानकेंद्र म्हणून कार्यरत होते.

नालंदामध्ये हजारो विद्यार्थी आणि शिक्षक शिक्षण व संशोधन करत होते. चीन, जपान, तिबेट, कोरिया आणि इतर देशांमधून विद्यार्थी येथे येत असत.

**येथे शिकवले जाणारे विषय-**

- बौद्ध तत्वज्ञान
- व्याकरण
- तर्कशास्त्र
- गणित
- खगोलशास्त्र
- आयुर्वेद
- साहित्य

**नालंदा विद्यापीठातील ग्रंथालय**

नालंदा विद्यापीठाचे ग्रंथालय प्राचीन जगातील सर्वात मोठया ग्रंथालयांपैकी एक होते. या ग्रंथालयाला ‘‘धर्मगंज’’ असे नाव होते.

**हे ग्रंथालय तीन मोठया इमारतीमध्ये विभागलेले होते-**

१. रत्नसागर
२. रात्नोदधी
३. रत्नरंजक

यापैकी रात्नोदधी ही नऊ मजली इमारत होती आणि त्यामध्ये दुर्मिळ हस्तलिखित ग्रंथांचा संग्रह होता.

**या ग्रंथालयामध्ये पुढील विषयांवरील हजारो ग्रंथ होते-**

- धर्म आणि तत्वज्ञान
- व्याकरण
- साहित्य
- खगोलशास्त्र
- वैद्यकशास्त्र
- गणित

विद्यार्थी आणि विद्वान येथे बसून अभ्यास, संशोधन आणि ग्रंथलेखन करत असत.

**३. विक्रमशीला विद्यापीठ**

विक्रमशीला विद्यापीठाची स्थापना धर्मपाल या पाल वंशातील धर्मपाल राजाने इ. स. ८व्या शतकात केली होती. हे विद्यापीठ बिहारमध्ये होते. येथे बौद्ध धर्माचे उच्च शिक्षण दिले जात असे.

विक्रमशीलामध्येही उत्तम ग्रंथांचे एक विशाल ग्रंथालय होते. येथे अनेक बौद्ध ग्रंथ, तंत्रशास्त्र, तत्वज्ञान आणि संस्कृती साहित्याचे हस्तलिखित संग्रहित होते. इ. स. च्या दहाव्या-अकराव्या शतकात तंत्रवाद आणि तांत्रिक प्रक्रिया हे बौद्ध धर्माचे प्रमुख अंग बनले होते. इथले अनेक आचार्य व विद्यार्थी तांत्रिक क्रियांचे अनुष्ठान करीत असत. तसेच इथले बरेच आचार्य न्यायशास्त्रात अत्यंत प्रवीण होते. या विद्यापीठात भारतातील भिन्न भिन्न भागातले विद्यार्थी अध्यायनासाठी येत, तसेच प्रदेशातूनही विद्यार्थी येत. अनेक तिबेटी भिक्षूंनी येथे शिक्षण घेतले आणि अनेक ग्रंथांचे भाषांतर करून ते तिबेटमध्ये नेले. त्यामुळे भारतीय ज्ञानाचा प्रसार इतर देशांमध्ये झाला.

इथले रत्नवज्र, जेतारी, रत्नकीर्ती, रत्नाकरशांती,ज्ञा नश्रीमित्र, दिपांकर श्रीज्ञान किंवा अतिश हे आचार्य आपल्या विद्वतेसाठी फार प्रसिद्ध होते.

**येथे शिकवले जाणारे विषय-**

- बौद्ध धर्मातील विविध संप्रदाय
- वेद
- अध्यात्मविद्या
- व्याकरण
- न्यायशास्त्र
- तंत्रविद्या इ.

**विक्रमशिला विद्यापीठातील ग्रंथालय**

विक्रमशीला विद्यापीठामध्येही उत्तम ग्रंथांचे एक समृद्ध ग्रंथालय होते. इथे अनेक विषयांवरती हस्तलिखित ग्रंथ होते. विद्यार्थी व भिक्षूंना अभ्यास, संशोधन आणि वाचण्यासाठी अत्यंत महत्वाचे ठिकाण होते. ताडपत्र (Palm leaves) आणि भोजपत्रावर लिहिलेल्या ग्रंथांचे जतन व्यवस्थित पद्धतीने केले जात होते. तसेच तिबेट, चीन, नेपाळ येथील विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येत असत, त्यामुळे ग्रंथालयात विविध भाषांवरील साहित्य उपलब्ध होते. येथील ग्रंथल्यामुळे बौद्ध धर्माच्या अध्ययन आणि प्रसारला मोठी चालना मिळाली.

**या ग्रंथालयामध्ये पुढील विषयांवरील ग्रंथ होते-**

विक्रमशिला विद्यापीठाच्या ग्रंथालयात

- बौद्ध धर्म
- तत्वज्ञान
- व्याकरण
- तर्कशास्त्र

**myresearchgo Volume 2, Issue 4,April 2026, ISSN: 3107-3816 (Online)**

- चिकित्सा इ. विषयांवरील अनेक मौल्यवाण हस्तलिखिते होती.

**४ वल्लभी विद्यापीठ**

वल्लभी विद्यापीठ हे प्राचीन भारतातील एक प्रसिध्द विद्यापीठ होते. हे गुजरातमध्ये स्थित होते. हे विद्यापीठ ६व्या ते ८व्या शतकात अत्यंत प्रसिद्ध होते. वल्लभी विद्यापीठाची स्थापना मैत्रक वंश यांच्या काळात झाली. या वंशाच्या राजांनी शिक्षणाला मोठा आश्रय दिला. येथे धर्मशस्त्र, अर्थशास्त्र, राजनीती, न्यायशस्त्र आणि साहित्य शिकविले जात असे. वल्लभीमध्ये मोठे ग्रंथालय होते. येथील ग्रंथालयात विविध विषयांवरील अनेक ग्रंथ व हस्तलिखिते होती. ज्यामुळे विद्यार्थ्यांना सखोल अध्ययन करता येत होते. देश विदेशातून विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येत असत, त्यामुळे याला जागतिक स्तरावर मान्यता मिळाली होती.

**येथे शिकवले जाणारे विषय-**

- धर्मशस्त्र
- तत्वज्ञान
- राजकारण व प्रशासन
- अर्थशास्त्र
- व्याकरण व भाषा
- न्यायशास्त्र
- साहित्य इ.

**वल्लभी विद्यापीठातील ग्रंथालय**

वल्लभी विद्यापीठ हे प्राचीन भारतातील एक महत्वाचे शिक्षणकेंद्र होते आणि त्याचे ग्रंथालयही अत्यंत समृद्ध व प्रसिद्ध होते. ताडपत्र आणि भोजपत्रावर लिहिलेले हस्तलिखित ग्रंथांचा मोठा संग्रह उपलब्ध होता. विद्यार्थी व विद्वानांसाठी ग्रंथालय हे अभ्यास, वाचन आणि संशोधनाचे मुख्य ठिकाण होते. बौद्ध आणि जैन धर्माशी संबंधित ग्रंथ मोठ्या प्रमाणात होते. त्या काळातील पद्धतीनुसार ग्रंथांचे संरक्षण व जतन व्यवस्थित केले जात होते.

**येथील ग्रंथालयात**

- धर्म
- तत्वज्ञान
- अर्थशास्त्र
- राजकारण
- व्याकरण न्यायशास्त्र इ. विषयांवरील अनेक ग्रंथ होते.

**प्राचीन ग्रंथालय परंपरेचे महत्त्व**

प्राचीन भारतीय ग्रंथालय परंपरेमुळे ज्ञानाचा प्रसार झाला. या ग्रंथालयांनी पुढील प्रकारे समाजाला योगदान दिले-

- ज्ञानाचा जतन
- संशोधनाला प्रोत्साहन
- विविध विषयांचा विकास
- आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना आकर्षित करणे

या परंपरेमुळे भारत जगातील प्रमुख ज्ञानकेंद्रे म्हणून ओळखला जात होता.

**प्राचीन विद्यापीठातील ग्रंथालय व्यवस्था**

प्राचीन भारतीय विद्यापिठांच्या यशामागे त्यांच्या समृद्ध ग्रंथालयांचा मोठा वाटा होता. त्या काळात छापाई तंत्रज्ञान नसल्यामुळे सर्व ग्रंथ हस्तलिखित स्वरुपात असत. त्यामुळे ग्रंथालये ही ज्ञानसंपदेची अमूल्य केंद्रे होती. ग्रंथालयामध्ये ग्रंथांचे वर्गीकरण, जतन आणि सूचीकरण करण्याची व्यवस्था होती. काही ठिकाणी ग्रंथपालही नेमले जात. ग्रंथांना कापडात गुंडाळून किंवा विशेष पेट्यांमध्ये सुरक्षित ठेवले जात असे.

**प्राचीन ग्रंथालयातील हस्तलिखित परंपरा**

प्राचीन भारतात ज्ञान जतन करण्यासाठी हस्तलिखित पद्धतीचा वापर केला जात असे. ग्रंथ लिहिण्यासाठी विविध प्रकारच्या सामग्रीचा वापर केला जात असे.

**उदा.**

- ताडपत्र
- भोजपत्र
- कागद
- तांब्याच्या पट्ट्या
- मातीच्या विटा
- कातडया वरील ग्रंथ

ग्रंथ लिहिल्यानंतर त्यांना सुरक्षित ठेवण्यासाठी विशेष पद्धती वापरल्या जात. ग्रंथांना कापडात गुंडाळून ठेवले जाई. काही ग्रंथालयांमध्ये ग्रंथांची सूची (catalogue) देखील तयार केली जात असे.

**प्राचीन ग्रंथालयांचे व्यवस्थापन**

प्राचीन भारतीय ग्रंथालयांमध्ये पुढील प्रकारची व्यवस्था होती –

- ग्रंथपाल (Librarian) – ग्रंथांची देखभाल आणि व्यवस्थापन
- वर्गीकरण प्रणाली- विषयानुसार ग्रंथांचे वर्गीकरण.
- सुचीकरण (Catalogue)- ग्रंथांची नोंद ठेवणे.
- संरक्षण- ग्रंथांचे जतन आणि दुरुस्ती.

काही ऐतिहासिक उल्लेखांनुसार ग्रंथपाल विदयार्थ्यांना योग्य ग्रंथ निवडन्यास मदत करत असत.

**प्राचीन ग्रंथालयांचा नाश**

इतिहासात अनेक आक्रमणांमुळे प्राचीन विद्यापीठे आणि त्यांची ग्रंथालये नष्ट झाली. विशेषत: १२ व्या शतकात नालंदा विद्यापीठावर झालेल्या आक्रमणात त्याचे विशाल ग्रंथालय जाळले गेले.

इतिहासकरांच्या मते त्या ग्रंथालयात लाखो हस्तलिखित ग्रंथ होते. या ग्रंथालयाचा नाश झाल्यामुळे भारतीय ज्ञानसंपदेचे मोठे नुकसान झाले.

**निष्कर्ष**

प्राचीन भारतीय विद्यापीठे आणि त्यांची ग्रंथालय परंपरा ही भारतीय संस्कृतीची महान परंपरा आहे. नालंदा, तक्षशीला, विक्रमशिला आणि वल्लभी यांसारख्या विद्यापीठांनी जगाला ज्ञान, संशोधन आणि शिक्षणाची समृद्ध परंपरा दिली.

या विद्यापीठांतील ग्रंथालये ही ज्ञानाची अमूल्य भांडारे होती. त्यांनी हजारो हस्तलिखित ग्रंथांचे जतन केले आणि ज्ञानाचा प्रसार केला. जरी अनेक ग्रंथालये नष्ट झाली असली तरी त्यांची परंपरा आजही आधुनिक ग्रंथालय व्यवस्थेला प्रेरणा देते.

प्राचीन भारतीय विद्यापीठांची आणि ग्रंथालयांची परंपरा ही भारताच्या बौद्धिक आणि सांस्कृतिक वारशाचा महत्वाचा भाग आहे.

**संदर्भसूची**

१. मराठी विश्वकोश खंड - ७

२. मराठी विश्वकोश खंड - ८

३. भारतीय संस्कृतीकोश खंड - ८

**myresearchgo Volume 2, Issue 4,April 2026, ISSN: 3107-3816 (Online)**

४. भारतीय संस्कृतीकोश खंड - ५

५. भारतीय संस्कृतीकोश - ४

६. भारतीय ज्ञान प्रणाली- प्रा. एम. एस. लिमण

७. ज्ञानगंगोत्री: मार्च-ऐप्रिल-मे २०११-१२ : १५

८. https://scholar.google.com

९. https://shodhganga.inflibnet.ac.in

१०. https://ndl.iitkgp.ac.in